# जाहिरात

## थेट मुलाखत (Walk in Interview)

विषय- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव येथील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे स्थानिक विभागीय निवड मंडळामार्फत थेट मुलाखतीव्दारे भरण्याबाबत

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव या संस्थेत कोविड-१९ विषाणुच्या पार्श्वभुमीवर रिक्त असलेली वैद्यकीय अधिकारी ही पदे कंत्राटी पध्दतीने (Contract Basis) १२० दिवसाकरीता भरण्याबाबत थेट मुंलाखत अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव येथे ०६.०५.२१ रोजी ४.०० वाजता वैद्यकीय अधिकारी, रिक्त पदांसाठी थेट मुलाखत घेण्यात येईल. सदर पदे भरण्याबाबतचे नियम व अटी प्रचलित शासन निर्णयानुसार राहतील.

| अ.क्र | पदाचे नांव | रिक्त पदांची संख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | ७ | एम.बी.बी.एस. |

१) वैद्यकीय अधिकारी या पदासाठी शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी (एम.बी.बी.एस), उमेदवाराची निवड गुणाक्रमे व प्रयत्न No of Attempts विचारात घेवुन करण्यात येईल.

२) **वयोमर्यादा** :- खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्गासाठी ४३ वर्ष (जाहिरात प्रसिध्दी दिनांका रोजी गणली जाईल).

३) वेतनश्रेणी :- एकत्रित ठोक मासिक मानधन रु.८५,०००/- (रु.पंच्याशी हजार मात्र)

नियम व अटी

१) अर्जदार हा संबंधीत पदाकरीता शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा, तसेच अर्जदारा विरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. नियुक्ती नंतर उमेदवारास वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय प्रमाणपत्र तिन महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

२) जन्मतारखेसाठी जन्मतारखेचा दाखला / शालांत परिक्षेचा दाखला किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३) सदरच्या जाहिरातीतील पद संख्या बदलण्याबाबतचा अथवा सदरची जाहिरात पुर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठातांनी राखुन ठेवलेला आहे.

४) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

५) एम बी बी एस सर्व वर्षाची परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका पदवी प्रमाणपत्र, प्रयत्न प्रमाणपत्र, इन्टर्नशिप कंप्लीशन प्रमाणपत्र

६) तुमचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अतर्गत कायम नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र किंवा भारतिय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

७) तुमची नियुक्ती संचालनालयाकडून संचालनालयाकडून बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होई पर्यत तात्पुरत्या स्वरुपाची असुन जर शासनातर्फे निवड मंडळामार्फत / नामनिर्देशनाने / बदली अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कायम स्वरुपाच्या उमेदवारास रुजू करण्यात आल्यास तुमची त्या पदावरील सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

टिप :- १) मुलाखतीसाठी येणा-या उमेदवारांनी कोविड-१९ प्रतिबंधक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

२) निवड प्राप्त उमेदवारांना कोविड-१९ आपत्कालीन परिस्थीतीचा अनुषंगाने लावण्यात येणा-या सर्व ड्युटी करणे बंधनकारक राहील.

उमेदवारांनी अर्ज व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह थेट मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. मुलाखत ही दररोज दुपारी ४.०० वाजता अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव यांचे कक्षात होईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच जे उमेदवार अन्य शासकीय अथवा निमशासकीय / खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत, त्यांनी संबंधीत संस्थेकडून ना हरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या छायांकीत प्रती जोडाव्यात. सदरच्या जाहिरातीतील पदसंख्या बदलण्याबाबतचे अथवा सदरील जाहिरात पुर्णत:रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवला आहे.

(डॉ.जयप्रकाश रामानंद)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
जळगांव

प्रति,

१) सुचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव
२) सर्व प्राध्यापक विभाग प्रमुख,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव
३) मुलांचे / मुलीचे /आवासी -निवासी वस्तीगृह शा.वै.म व रु जळगांव
४) ग्रथालय, सुचना फलक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव
५) सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये
६)

प्रत :-

१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२) मा.संचालक, संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
३) मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव